सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन १८९४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २

# पेठ विभागासंबंधीच्या विधीबाबत अधिनियम, १८९४

**(दिनांक २९ एप्रिल, २००६ पर्यंत सुधारलेला)**

# Bombay Act No. II of 1894

# THE PEINT LAWS ACT, 1894

*(As modified upto the 29th April, 2006 )*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

2006

[किंमत : रु. ४.००]

# पेठ विभागासंबंधीच्या विधीबाबत अधिनियम, १८९४

## अनुक्रमणिका

कलमे


१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. सन १८७४ चा अधिनियम क्रमांक १४ याची पेठ विभागापुरती सुधारणा.

३. नाशिकचे विधि पेठ विभागास लागू करणे.

४. इतर विधि निरसित करणे.

५. प्रलंबित कार्यवाही.


एच ४०३६ (४,०६७—८-२००६)

# [1] सन १८९४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २.

## ( पेठ विभागासंबंधींच्या विधीबाबत अधिनियम, १८९४ )

[ २० डिसेंबर, १८९४ ]

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये या अधिनियमाचे अनुकूलन करण्यात आले व त्यात फेरबदल करण्यात आले.

**मुंबई प्रेसिडेन्सीमधील पेठ विभागात अमलात असलेल्या विधीत सुधारणा करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** पेठ विभागात अमलात असलेल्या ज्या विधीस, भारताचे राज्य सचिव यांनी, दिनांक १४ जुलै, १८८५ हा दिनांक असलेल्या परिषदेतील एका ठरावान्वये [२] व्हिक्टोरिया परिनियम ३३, प्रकरण १, कलम १ याच्या तरतुदी लागू असल्याचे जाहीर केले आहे. तो विधि, नाशिक जिल्ह्यात अमलात असलेल्या विधीप्रमाणेच असला पाहिजे आणि उक्त विभाग [३] अनुसूचित जिल्ह्यांबाबत अधिनियम, १८७४, याअन्वये अनुसूचित जिल्हा म्हणून असण्याचे बंद झाले पाहिजे ;

सन १८७४ चा १४.

**आणि ज्याअर्थी,** हा अधिनियम संमत करण्यासाठी [२] भारतीय परिषदांबाबत अधिनियम, १८९२, याच्या कलम ५ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे हिज एक्स्लन्सी गव्हर्नर जनरल यांची पूर्वमंजुरी मिळविलेली आहे ;

**त्याअर्थी,** याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, '' पेठ विभागासंबंधींच्या विधीबाबत अधिनियम, १८९४, '' असे म्हणावे आणि तो दिनांक १ जानेवारी, १८९५ रोजी अमलात येईल.

सन १८७४ चा अधिनियम, क्र. १४, याची पेठ विभागापुरती सुधारणा.

**२.** [३] अनुसूचित जिल्ह्यांबाबत अधिनियम, १८७४ याच्या कलम १ मधील '' अनुसूचित जिल्हे '' यांच्या व्याख्येत काहीही असले तरी, पेठ विभाग हा, ही त्या अधिनियमाच्या अर्थानुसार अनुसूचित जिल्हा आहे असे समजण्यात येणार नाही.

सन १८७४ चा १४.

नाशिकचे विधि पेठ विभागास लागू करणे.

**३.** नाशिक जिल्ह्यात अमलात आहेत असे व पेठ विभागात अमलात नाहीत अशा सर्व अधिनियमिती उक्त विभागात अमलात येतील.

इतर विधि निरसित करणे.

**४.** उक्त पेठ विभागात अमलात आहेत असे आणि नाशिक जिल्ह्यात अमलात नाहीत अशा सर्व अधिनियमिती, उक्त विभागासाठी निरसित करण्यात येतील.

प्रलंबित कार्यवाही.

**५.** हा अधिनियम ज्या दिनांकास अमलात येईल त्या दिनांकापूर्वी उक्त विभागातील कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे सुरू केलेली व त्या दिनांकास प्रलंबित असलेली सर्व कार्यवाही [४][प्रांतिक शासन] निदेश देईल अशा प्राधिकाऱ्याकडून निकालात काढल्या जातील आणि पूर्वी सांगितले असेल ते खेरीजकरून, जणू काही, हा अधिनियम संमत झाला नाही असे समजून सर्व कार्यवाही पुढे चालू ठेवण्यात आली पाहिजे.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी सन १८९४ चे **मुंबई सरकारचे राजपत्र,** भाग पाच, पृष्ठे २ पहा ; निवड समितीच्या अहवालासाठी पहा पृष्ठे ३ ; आणि परिषदेच्या कार्यवाहीसाठी पहा पृष्ठे १७, १९ आणि ८१.

[२] आता **भारत सरकारचा** अधिनियम, १९३५ पहा.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये ' अनुसूचित जिल्ह्यांबाबत अधिनियम, १८७४ ' अमलात असल्याचे बंद होईल.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे '' गव्हर्नर-इन-कौन्सिल '' या शब्दांऐवजी '' प्रांतिक शासन '' हे शब्द समाविष्ट करण्यात आलेत.